दिनांक २९/०१/२०२१

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अँन्टी करप्शन ब्युरो अकोला घटक |
| २ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) संदीप उपासराव घोडे, वय ४२ वर्ष, व्यवसाय-नौकरी, सहायक अभियंता, विज वितरण केंद्र पिंजर, ता. बार्शीटाकळी जि.अकोला, वर्ग-२, रा. एल. टी. इंगळे यांचे घरी भाड्याने, न्यु खेतान नगर, संतोषी माता मंदिर जवळ, कौलखेड रोड, अकोला व २) खाजगी इसम सुनिल अवचार, पत्रकार दैनिक राज्योन्नती, रा. अकोला |
| ३ | अपराध घडला तारीख वेळ | २८/१२/२० चे १४.४५ ते ३०/१२/२० चे २०.०० वा. चे दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | ३०००/- रुपये |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | तकारदाराचा संशय आल्याने आरोपीतांविरूध्द सापळा कारवाई आजमाविता आली नाही. |
| ६ | घटनास्थळ | श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळयासमोर कौलखेड चौक, अकोला |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तकारदार यांनी दि. २८/१२/२०२० रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अकोला येथे तकार दिली की, माळशेलु शिवार, ता.मंगळुरपीर, जि.वाशीम गावातील १५ शेतक-यांना नवीन विज जोडणी करीता शासकिय कंत्राटदार यांनी १.३ डीडीएफ. योजनेअंतर्गत दोन रोहीत्रांची (डिपी) उभारणी केलेले कामकाज नियमबाहय आहे असे म्हणुन संबंधीत ग्राहकांना मिटर देण्याचे काम विनाकारण प्रलंबीत ठेवले तसेच वर्तमानपत्रात शासकिय कंत्राटदार व संबंधीत लोकसेवकावर वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द करण्याची धमकी देउन दबाव आणला. तकारदाराने यातील आलोसे. यांना मिटर देण्यासाठी तसेच वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द न करण्यासाठी विनंती केली असता, आलोसे. घोडे यांनी आरोपी खाजगी ईसम पत्रकार सुनिल अवचार यांचेकरीता तसेच स्वत:करीता असे एकुण ३०००/- रू. लाचेची मागणी करून त्यापैकी ५००/-रू. आलोसे घोडे यांनी स्वत:करीता मागुन तकारदारास ३१ डिसेंबरच्या पार्टीची मागणी केली. आरोपीतांना तकारदाराचा संशय आल्याने सापळा कार्यवाही आजमाविता आली नाही. त्यामुळे फिर्यादीचे तकारीवरून नमुद आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री विशाल गायकवाड, मा. अपर पो.अ. श्री अरूण सावंत, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती तसेच मा. पोलीस उपअधीक्षक, श्री एस. एस.मेमाणे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अकोला यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस निरीक्षक ईश्वर चव्हाण, पो.हे.कॉ. अनवर खान, पो.ना. अरूण इंगोले, पो.ना. सचिन धात्रक, पो.कॉ. सुनिल येलोने, पो.कॉ. प्रदीप गावंडे, चालक पोना. सलीम खान यांनी पार पाडली.

नागरिकांनी अशाचप्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तकार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

मोबाईल क. ८८०५४२४७००
ऑफिस फोन नं. ०७२४-२४२०३७०
टोल फ्रि कं. १०६४

( आय. व्ही. चव्हाण )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो अकोला